**CNR No. MHWR030009882022**
**नि. फौ. ख. क्र. १४२/२०२२**
**सरकार / प्रमोद**
**<u>नि.क्र. २६</u>**

| | |
|---|---|
| <u>आरोपीचे नाव</u> | : प्रमोद सुखदेव चुनारकर, |
| वय | : ४४ वर्षे, व्यवसाय : मजुरी, |
| रा. | : सिध्दार्थ नगर, वर्धा, ता. जि. वर्धा. |

प्रश्न क्रमांक १ : मी आता तुम्हाला जे प्रश्न विचारणार आहे त्यांची उत्तरे देण्याकरिता तुम्ही बांधील नाही. तुम्ही उत्तर देण्याचे नाकारू शकता. त्याकरीता तुम्हाला कोणतीही शिक्षा होणार नाही. परंतु तुम्ही उत्तर दिल्यास तुम्ही दिलेले सदर उत्तर हे तुमच्या विरूध्द वापरले जावू शकते. हे तुम्हाला समजले का ?

उत्तर : होय.

प्रश्न क्रमांक २ : अभियोग पक्षातर्फे न्यायालयात सादर करण्यात आलेला पुरावा तुम्हाला समजला काय ?

उत्तर : होय.

प्रश्न क्रमांक ३ : अभियोगपक्षाचे सा.क्र. १ अविनाश याच्या साक्षीत असे आले आहे की, तो दोन वर्षापुर्वी संध्याकाळी ०६:४५ वाजताचे सुमारास तुमचे घरी तुमचे लहान भावाला गाडी मागण्याकरीता गेला होता. याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर : हे खरे नाही.

प्रश्न क्रमांक ४ : त्याच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, त्यावेळी तुम्ही त्याला आई बहिणीच्या शिव्या देवून तुम्ही त्याचे अंगावर चाकु उगारला तो त्याचे डावे हाताचे काखेत लागल्याने त्याला ४ टाके लागले होते. याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर : हे खरे नाही.

प्रश्न क्रमांक ५ : त्याच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, त्यामुळे त्याने पोलिस स्टेशनला तुमचेविरूध्द नि.क्र. ०९ व १० वरील रिपोर्ट व छापील प्रथम खबर दिली होती. याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर : हे खरे नाही.

प्रश्न क्रमांक ६ : त्याच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, ज्या चाकुने त्याला मारहाण केली होती तो भाजी व फळ कापणारा मुठ नसलेला चाकु होता. याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर : हे खरे नाही.

प्रश्न क्रमांक ७ : अभियोगपक्षाचे सा.क्र. ४ अपेक्षा हिच्या साक्षीत असे आले आहे की, दि. ०१/०२/२०२२ रोजी रात्री ०८:१५ वाजताचे सुमारास तिचे पती अविनाश तुमचा भाउ आशिष याचेकडे गाडी मागण्याकरीता गेले होते. याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर : हे खरे नाही.

प्रश्न क्रमांक ८ : त्याच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, त्यामुळे तुम्ही तिचे पतीला आशिषच्या घरी का गेले या कारणावरून शिवीगाळ केली होती. तिला आवाज आल्यामुळे तिने बाहेर येवून बघितले तेव्हा तुमची व तिचे पतीची हातापाई चालु असल्याचे तिला दिसले होते. याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर : हे खरे नाही.

प्रश्न क्रमांक ९ : तिच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, तुम्ही तिचे पतीला डाव्या बाजुचे काखेमध्ये चाकुने मारहाण केल्याने तिचे पतीला चार टाके लागले होते. त्यामुळे तिचे पतीने पोलिसात तक्रार दिली होती. याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर : हे खरे नाही.

प्रश्न क्रमांक १० : अभियोगपक्षाचे सा.क्र. ५ श्री. चाफलेकर यांच्या साक्षीत असे आले आहे की, दि. ०२/०१/२०२२ रोजी ते पोलिस स्टेशन वर्धा शहर येथे कार्यरत असतांना त्यांना अपराध क्र. ०३/२०२२ चा तपास मिळाला होता. याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर : हे खरे नाही.

प्रश्न क्रमांक ११ : त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, तपासादरम्यान त्यांनी

पंचांना नि.क्र. १७ वरील सुचनापत्र देवून ते पंचासह सिध्दार्थ नगर, वर्धा येथे घटनास्थळावर गेले होते. याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर : हे खरे नाही.

प्रश्न क्रमांक १२ : त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, तेथे त्यांनी पंचासमक्ष घटनास्थळाची पाहणी करून त्याबाबत नि.क्र. १८ वरील घटनास्थळ पंचनामा तयार केला होता. याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर : हे खरे नाही.

प्रश्न क्रमांक १३ : त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, त्यानंतर त्यांनी फिर्यादी व साक्षीदारांचे बयाण नोंदविले होते. तसेच तुमचा शोध घेवून तुम्हांला सुचनापत्र दिले होते. याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर : हे खरे नाही.

प्रश्न क्रमांक १४ : त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, तुम्ही त्यांना गुन्हयात वापरलेला चाकु पंचांसमक्ष तुमचे घरून काढून दिल्याने त्याबाबत त्यांनी नि.क्र. १९ वरील जप्ती पत्रक तयार केले होते. याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर : हे खरे नाही.

प्रश्न क्रमांक १५ : त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, त्यांनी न्यायालयात दाखल प्रदर्श अ वरील चाकु तोच चाकु असल्याचे ओळखले. याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर : हे खरे नाही.

प्रश्न क्रमांक १६ : त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, त्यानंतर त्यांनी जप्त मुद्देमालाची वैद्यकीय अधिका—यांकडून क्युरी करून मिळण्याबाबत नि.क्र. २० वरील तहरीर दिली आणि त्याबाबत अहवाल प्राप्त केला होता. याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर : हे खरे नाही.

प्रश्न क्रमांक १७ : त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, त्यांना तपासाअंती तुम्ही

फिर्यादीला काखेमध्ये चाकुने मारहाण करून दुखापत केल्याचे आणि दमदाटी केल्याचे निष्पन्न झाल्यामुळे त्यांनी तुमचेविरूध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर : हे खरे नाही.

प्रश्न क्रमांक १८ : अभियोगपक्षाचे सा.क्र. ६ श्री. रामटेके यांच्या साक्षीत असे आले आहे की, दि. ०२/०१/२०२२ रोजी ते सामान्य रूग्णालय, वर्धा येथे कॅज्युयल्टी विभागात आपातकालीन विभागामध्ये कार्यरत असतांना त्यांचेकडे पो.शि. श्री. महेश, ब.नं. १४६१ यांनी रात्री ९ वाजताचे सुमारास रूग्ण नामे अविनाश धर्मपाल रामटेके यांना तपासणीकरीता आणले होते. याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर : हे खरे नाही.

प्रश्न क्रमांक १९ : त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, त्यांनी सदर रूग्णाची तपासणी केली असता त्यांना त्याचे डावे काखेमध्ये ४ बाय ०.५ सें. मी. ची जखम आणि त्याचे उजवे हाताचे कोप—यावर ३ बाय ३ सें.मी.ची खरचटल्याची जखम आढळून आली होती. याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर : हे खरे नाही.

प्रश्न क्रमांक २० : त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, सदरच्या जखमा साध्या स्वरूपाच्या व ताज्या होत्या. तसेच त्या टणक व बोथट वस्तुने झाल्या होत्या. याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर : हे खरे नाही.

प्रश्न क्रमांक २१ : त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, त्यामुळे त्यांनी नि.क्र. २३ वरील वैद्यकीय अहवाल व नि.क्र. २४ वरील इन्ज्युरी रिपोर्ट दिला होता. याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर : हे खरे नाही.

प्रश्न क्रमांक २२ : त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, त्यानंतर दि. १७/०१/२०२२ रोजी पो.शि. श्री. चाफलेकर, ब.नं. ६३० यांनी

त्यांचेकडे नि.क्र. २० वरील तहरीरसह एक शस्त्र क्युरी करण्याकरीता आणले होते आणि त्यांनी त्या शस्त्राची क्युरी करून नि.क्र. २५ वरील अहवाल दिला होता. याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर : हे खरे नाही.

प्रश्न क्रमांक २३ : त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, त्यांनी ज्या शस्त्राची क्युरी केली होती ते न्यायालयात एम.ओ.क्र. १ वरील शस्त्र तेच शस्त्र असल्याचे सांगितले. याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर : हे खरे नाही.

प्रश्न क्रमांक २४ : त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, सदर रूग्णाला झालेली जखम एम.ओ.क्र. १ वरील चाकुने होवू शकते. याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर : हे खरे नाही.

प्रश्न क्रमांक २५ : अभियोगपक्षाचे साक्षीदार तुमच्याविरूध्द साक्ष का देत आहे याचे तुम्हाला कारण सांगता येईल काय ?

उत्तर : नाही.

प्रश्न क्रमांक २६ : तुम्हाला शपथेवर साक्ष द्यायची आहे काय ?

उत्तर : नाही.

प्रश्न क्रमांक २७ : तुम्हाला बचावाचे साक्षीदार तपासायचे आहे का? असल्यास कोणते?

उत्तर : नाही.

प्रश्न क्रमांक २८ : तुम्हाला खटल्याबद्दल काही सांगायचे आहे काय ?

उत्तर : नाही.

आरोपीची सही

..........................

माझे समक्ष

Digitally signed by VICKRANT PRALHAD KHANDARE
Date: 2026.07.24 15:56:10 +0530

(वि. प्र. खंदारे)

दिनांक : २४/०७/२०२६

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वर्धा.
(फौजदारी न्यायालय क्र. १)

**<u>प्रमाणपत्र</u>**

प्रमाणित करण्यात येते की, आरोपीची जबानी माझेसमक्ष त्याचे सांगण्याप्रमाणे त्याचे शब्दात त्याचे विद्वान वकिलांचे उपस्थितीत नोंदविण्यात आली.

माझे समक्ष

(वि. प्र. खंदारे )
दिनांक : २४/०७/२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वर्धा.
(फौजदारी न्यायालय क्र. १)

____________________
आरोपीची सही/अंगठा

____________________
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग